विद्यावर्धिनी संचालित,
**अण्णासाहेब वर्तक मानव्य, केदारनाथ मल्होत्रा वाणिज्य व ई. एस. अंड्राडिस विज्ञान महाविद्यालय**
वसई रोड (प.), जि. पालघर – ४०१२०२
(मुंबई विद्यापीठाशी संलग्न)

मराठी विभाग
आणि
भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद (ICSSR), पश्चिम विभागीय केंद्र, मुंबई
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

Indian Council of Social Science Research

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# विद्यावार्ता

International Peer reviewed Research Journal



## ।। संत साहित्याची समकालीनता ।।

## एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

शनिवार दि. १७ डिसेंबर २०२२

समन्वयक
डॉ. शत्रुघ्न फड
(मराठी विभाग प्रमुख)
९४२२६७०५३०

सहसमन्वयक
डॉ. सखाराम डाखोरे
(सहाय्यक प्राध्यापक)
९८५०११६६४५

प्रा. शैलेश औटी
(सहाय्यक प्राध्यापक)
९८३३४८७४६८

निमंत्रक
डॉ. अरविंद उबाळे
(प्राचार्य)

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

**Special Issue-02**
**Dec. 2022**

**विद्यावर्धिनी शिक्षणसंस्था वसई**
आणि
**भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद (ICSSR),**
**पश्चिम विभागिय केंद्र, मुंबई**
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

## ‘संत साहित्याची समकालीनता‘

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झाालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

“Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# INDEX

01) महाराष्ट्रीय संतांचे भाषिक योगदान
प्रा. नेहा सावंत, मुंबई ||11

02) संत साहित्य आणि सामाजिक परिवर्तन
सह. प्रा. प्रज्ञा मनिष पंडित, ठाणे ||19

03) वारकरी संप्रदायातील संत आणि त्यांचे विचार
प्रा.मनिषा प्रकाश ठाकरे, नायगाव (पूर्व) ||26

04) गोमंतकीय संतकवी सोहिरोबानाथ आंबिये
प्रा. वीणा केरीकर, गोवा ||30

05) समाज प्रबोधक एकनाथांची भारूडे
सहा. प्रा. उगले वृषाली सोपान, नाशिकरोड ||35

06) संत नामदेव यांच्या अभंगांचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये
प्रा. संजय नामदेवराव आठवले, जि. नांदेड ||40

07) संत साहित्यात संत कवयित्रींचे योगदान
सह. प्रा. संतोष लक्ष्मण राणे, ठाणे ||45

08) संत नामदेवांची अध्यात्मिक लोकशाही
सहा.प्रा.सुधीर सैंदाणे, जि. पालघर ||51

09) संत साहित्य : संशोधनाच्या नव्या दिशा
मनोज रामजी मुनेश्वर, औरंगाबाद ||53

10) मध्ययुगीन संतांचा विचार आणि पर्यावरण: एक अभ्यास
मनोरमा राजरत्न बनसोडे(तिजारे) ||56

11) हरिपाठ व विज्ञान : एक अनुबंध
प्रा.डॉ.दत्तात्रय प्र.डुंबरे, श्रीम.मयुरी पवार, जि.पालघर ||59

12) संत साहित्यातील संत कवयित्रींचे योगदान असलेल्या कवयित्री महदंबा, मुक्ताबाई, ...
प्रा. सौ. रिध्दिसिध्दी सुरेश गायकवाड, जिल्हा—पालघर ||68

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

होत असतानाच्या या पार्श्वभूमीवर खरा परमात्म कोणता, शुद्ध अध्यात्म, चांगले काय, वाईट काय, योग्य — अयोग्य काय याही दृष्टिकोनातून संत कवयित्रींचे महत्त्व आहे. श्रद्धा आणि चिकित्सा यांच्याकडे संतुलितपणे व एकत्रितपणे पाहता येईल. महाराष्ट्रात अजून तरी कथन आणि श्रवण संस्कृती टिकून आहे. आजच्या पिढीला संत विचारांचे एकात्म दर्शन, संतांचे नाव माहिती आहे, पण संत विचार किती रुजला आहे, हा प्रश्न आहे. म्हणून समग्र संत कवयित्री लिखित साहित्यातून संतुलित, सकस विचार तरुणांपर्यंत पोहचणे गरजेचे आहे. संत म्हटले की पूज्यता, भाबडेपणा आणि उत्सव रूप एवढेच नव्हे तर ते एक सार्वकालीन असे जगण्याचे शास्त्र आहे हे निश्चित!

**संदर्भ ग्रंथ सूची :**

**पुस्तके :**

१. दोडे, अरविंद. ( २००५ ), स्त्री संत दर्शन, सुदर्शन प्रकाशन .

२. प्रा. भगत, रा. तू. ( २००३ ), संत साहित्य आणि दलित संवेदन, चैतन्य प्रकाशन.

३. आजगावकर, जगन्नाथ रघुनाथ ( १९८० ) ,प्राचीन मराठी संत कवी खंड तिसरा, प्रकाशक डॉ. दि. ग. नाईक.

४. प्रा. भगत, रा. तू. ( २००५ ), संतसाहित्य आणि समाज प्रबोधन, दिलीपराज प्रकाशन.

५. कुलकर्णी, व. दि. ( १९९४ ), संतसाहित्य सारस्वत आकलन आणि आस्वाद , मुंबई विद्यापीठ आणि अनुभव प्रकाशन.

६. चौघुले, वि.श. ( २००६ ), संत समाज आणि अध्यात्म प्रकाशन.

**वेब पोर्टल :**

1. maharashtrtoday.co.in
2. santsahitya,in
3. Prashantpublication.com
4. Marathi vishwakosh
5. marathisrushti.com
6. evivek
7. kolaj.in

**08**

# संत नामदेवांची अध्यात्मिक लोकशाही

**सहा.प्रा.सुधीर सैंदाणे**
इतिहास विभाग
अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय, वसई जि. पालघर

***********

अध्यात्मिक लोकशाहीचा पाया महाराष्ट्रान ज्ञानेश्वरांनी घातला. परंतु ही लोकशाही पुढे मोठी करण्याचे व महाराष्ट्रात दृढमूल करण्याचे काम संत नामदेवांनी केले. संत ज्ञानेश्वर जरी अध्यात्मिक लोकशाहीचे प्रवर्तक असले तरी नामदेव खरे प्रचारक मानले जातात. एक देव, एक धर्म आणि एक निशाण महाराष्ट्रातील सामान्य माणसांना ज्ञानेश्वरांनी दिल्यामुळे सर्वांना ऐक्यभावना जाणवू लागली. मी आणि महाराष्ट्र अशी एक भावना बळावली. सामान्य माणसाला ऐक्यभावना मोलाची वाटू लागली, एकार्थी संतसाहित्याची फलश्रुती म्हणजेच अध्यात्मिक लोकशाही होय. कारण संत साहित्यात शेवटी ऐक्यभावना वाढीला लागणे गरजेचे होते. सर्वांना समानतेची जाणीव होणे ही त्यावेळी महाराष्ट्राची गरज होती. ती या अध्यात्मिक लोकशाहीने पूर्ण केली. जे पूर्वी उच्चवर्णीयांपूरते मर्यादित होते. ते बहुजन समाजातील अगदी सामान्यांना ज्ञानेश्वरांनी उपलब्ध करून दिले व त्याचा खऱ्या अर्थाने प्रचार केला तो संत नामदेवांनी.

प्राचीन मराठीच्या इतिहासात जे पाच कवी मानले जातात त्यातील नामदेव हे एक. त्यांच्या चरित्राबद्दल बऱ्याच आख्यायिका आहेत. 'भक्तीविजय' या महीपतीच्या ग्रंथात नामदेवाच्या चरित्रात अनेक आख्यायिका सांगीतल्या आहेत. एकूण ८० वर्षाच आयुष्य लाभलेले नामदेव यांनी ८ व वर्षाच्या आयुष्यात अनेक चढउतार अनुभवले आहेत. शिंपी जातीत नामदेव जन्माला आले. त्यामुळे जातीतील उच्चनिचता नामदेवांना सुरुवातीपासूनच सहन करावी लागली.

नामदेवांच्या ग्रंथरचनेचा विचार करताना नामदेव व ज्ञानेश्वर यांची झालेली भेट लक्षात घेणे आवश्यक आहे. या दोघांनी १३ –१४व्या शतकातील लोकांचे दु:ख पाहिले. समाजाचा ऱ्हास पाहिला आणि तो सहन होईना म्हणून,

'बुडती हे जन न देखवी डोळा'

या न्यायाने अभंग रचना केली. समाजप्रबोधन करण्याचे एक प्रभावी साधन म्हणून अभंगाचा वापर केला. या दोघांनी उत्तर– दक्षिण भारतात जवळ–जवळ साडे बारा वर्षे प्रवास केला. या दोघांच्या भेटीचा महाराष्ट्रावर फार मोठा परिणामझाला आहे. नामदेवांनीज्ञानेश्वरांच्या सहवासात विविध प्रकारची ग्रंथरचना केली आहे. त्या दोघांच्या भेटीचा प्रभाव नामदेवांच्या अभंग रचनेवर पडला आहे. तो असा– एक ज्ञानाचा ईश्वर तर दुसरा ज्ञानाचा वाहक, ज्ञानेश्वर अद्वैत ज्ञानाची अनुभूती तर नामदेव अनुभूतीचा सगुण अनुभव,ज्ञानेश्वर ज्ञानश्रेष्ठ तर नामदेव भक्तीने श्रेष्ठ. नुसते ज्ञान रुक्ष होऊ नये किंवा नुसती भक्ती आंधळी होऊनये यासाठी ज्ञानात्मभक्तीचा ओलावा मिळावा लागतो. ज्ञानेश्वर आणि नामदेव यांच्या भेटीतून हे घडले. सुरुवातीला नामदेव हट्टी व अहंकारी होते कारण मुक्ताईने नामदेवाची कानउघाडणी केलेली आहे.

अखंड जयाला देवाचा शेजार
काय अहंकार गेला नाही।

लौकिक जीवनातील प्रलोभन (आशा) नामदेवांना असल्याने अलौकिक सुखाचा मार्ग नामदेव दाखवूशकले नाही. ज्ञानेश्वरांच्या प्रभावा नंतर भागवत किंवा वारकरी संप्रदायाला परमेश्वराच्या भक्तीचा गोडवा कसा असतो ते सांगण्याचा प्रयत्न केला. सगुण भक्तीच्या प्रचाराला नामदेवांनीप्रारंभ केला.किर्तन परंपरा नामदेवांनी सुरू केली. शिवाय ज्ञानेश्वरांच्या भावंडांचे चरित्र लिहिले, वारकरी संप्रदायातील नामदेव हे पहिले चरित्रकार आणि हेएकमेव संत त्यांची अभंग संपदा जवळजवळ पंचवीशेच्या घरात गेलेली दिसून येते. नामदेवांनी नामभक्तीची विविध रूपे भागवत संप्रदायाला दिली. नामभक्तीचे प्रमुख दोन घटक समजावून सांगितले. ते घटक म्हणजे एक पंढरपूर आणि दुसरा विठ्ठल या दोन घटकांची थोरवी नामदेवांनी वर्णन केली आहे. एके ठिकाणी नामदेव म्हणतात–

पंढरीसी वास । चंद्रभागे स्नान ।
आणिक दर्शन । विठोबाचे ।
हेची मज घडो । जन्मोजन्मातरी ।
मागणे श्रीहरी । नाही दुजें ।।

ज्ञानेश्वरांचे आवाहन विचाराला तर नामदेवांचे आवाहन भावनेला आहे. त्यामुळे नामदेवांचे लेखन भावगम्य आहे. नामदेवाचे व्यक्तीमत हे काव्यानुकूल होते. ज्ञानेश्वरांनी समाधी घेतली त्यावेळी नामदेव स्वत: हजर होते.त्यानंतर सोपानदेव, मुक्ताबाईव निवृत्तीनाथ यातिघांनी जगाचा निरोप घेतल्यावर नामदेवांना पोरके झाल्यासारखे वाटले आणि नामदेवांना या दु:खाचा भार कमी करण्यासाठी ज्ञानेश्वरांचे चरित्र लिहावे लागले. म्हणजेच आदी, समाधी आणितीर्थावळी. नामदेवाची ही निर्मिती म्हणजे अस्सल मराठीचा आविष्कार आहे. ज्ञानेश्वरांच्या नंतर नामदेवांनी पुन्हा एकदा तिर्थयात्रा केल्याचा उल्लेख सापडतो.

नामदेवांची वस्तूनिष्ट भूमिका त्यांच्या अभंगात दिसते. त्यामुळे त्यांचा अनुभव अधिक अंतर्मुख दिसू लागतो. नामदेवांची शैली अधिक सोपी आहे. त्यात भक्ती, वात्सल्य आणि कारुण्य या गुणांचे दर्शन घडते. नामदेवांच्या अभंगामध्ये एक विशिष्ट प्रकारची पारमार्थिक तळमळ दिसते तरीही नामदेवाचे पूर्णपणे समाधान झाल्याचे अभंगात दिसत नाही. उलट नामदेवांच्या ठिकाणी असणारी दिव्य असमाधानाची झलक त्यांच्या अभंगातून दिसते. नामदेवांच्या अभंगामध्ये उपरोध, लडीवाळपणा, प्रादेशिक भाषेचा वापर या सर्वांचे सुंदर दर्शन घडते. नामदेव जेव्हा पंजाबात गेले तेव्हा तेथे त्यांनी काही वर्ष भागलपूर येथे वास्तव्य केले. त्याठिकाणी नामदेवाची मंदिरे देखील आहेत. नामदेवांची हिंदी–मिश्रीत पंजाबी भाषेत ६१ अभंग लिहिले आहेत. शीख धर्मीयांच्या पवित्र 'ग्रंथसाहेब'यामध्ये नामदेवांची पदे सामावलेली आहेत. 'नामदेवजी की मुखबानी'यात ती सामावली जातात. नामदेवांची काही रचना ब्रज भाषेत आहे. त्याचबरोबर अवधी, मारवाडी, राजस्थानी इ.भाषांतून नामदेवांनी अभंगरचना केलेली आहे. इतर धर्मीयांच्या ग्रंथामध्ये देखील नामदेवांच्याअभंगांना विशेष स्थान मिळाले आहे.नामदेवांच्या अभंगातील काही रचना

पंजाबी भाषेला जवळची आहेत जसे—
जैसे ताप दे निरमल घामा।
तैसे रामनामबिनु बापुरो नामा ।
प्रणवित नामदेऊ नाकही बिना ।
ना सोहै बत्तीस लखना ।

**नामदेवांच्या कार्याचे महत्त्व —**

**अ.पंथीय कार्य :**

ज्ञानेश्वरांच्या बरोबरीने वारकरी संप्रदायाच्या प्रचारासाठी प्रयत्न केले त्यासाठी दोन तीर्थयात्रा केल्या.

राज्याबाहेर वारकरी संप्रदायाला पोहचविण्याचे कार्य केले.

ज्ञानेश्वरांचा सहवास त्यांना लाभला परंतु ह्या कालावधीत अनेक जातींच्या संतांचा संतमेळा पंढरपुरात जमा झाला आणि त्यामुळे महाराष्ट्राच्या अध्यात्मिक क्षेत्रात चौतन्य निर्माण झाले.

संतमेळ्याचा परिणाम सामाजिक परिस्थितीवरही झाला आणि मर्यादित अर्थाने का होईना समतेचे तत्त्व महाराष्ट्राच प्रस्थापित झाले.

ह्यातूनच पंढरपुरात अध्यात्मिक लोकशाही उदयाला आली.

सावतामाळी, नरहरी सोनार, चोखामेळा इ. संतांनी आपल्या भक्तीभावाने व अभंग रचनेने उभ्या महाराष्ट्राला वेड लावले.

वारकरी संप्रदाय सर्वसामान्य लोकांना आपला वाटू लागला.

**आ.वाडमयीन कर्तृत्त्व :**

मराठीत पहिल्यांदा भावकविता लिहिली गेली.

मराठीत प्रथमच आत्माविष्कार कविता लिहिली गेली.

किर्तन परंपरेची सुरूवात झाली.

**संदर्भ ग्रंथ :**

१. तुळपुळे, शं.गो : पाच संतकवी, व्हीनस प्रकाशन, पुणे, आ.दुसरी, १९६२

२. कोलते, वि.भि : प्राचीन मराठी साहित्य संशोधन. श्री लेखन वाचन भांडार, पुणे, १९६८

३. देशपांडे, अ.ना : प्राचीन मराठी वाङ्मयाटा इतिहास, भाग दुसरा, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७३

४. नसिराबादकर, ल.रा : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, आ.दहावी २०१३

५. पेंडसे, शं.दा : ज्ञानदेव आणि नामदेव, अ.अं कुलकर्णी, पुणे, १९९६.

**09**

# संत साहित्य : संशोधनाच्या नव्या दिशा

**मनोज रामजी मुनेश्वर**
संशोधक विद्यार्थी
बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

**********

१३ व्या शतकापासून १६ व्या शतकापर्यंत संस्कृत साहित्यशास्त्राचा प्रभाव मराठीवर दिसतो. मध्ययुगीन मराठी वाङ्मय हे प्राधान्याने अध्यात्मपर आहे. सर्व समाजजीवनच धर्माधिष्ठित असल्यामुळे ते वाङ्मयही धर्मप्रवण असणे अपरिहार्य ठरते. मराठी वाङ्मयाचा आदिकाल तर विविध संप्रदाय, धार्मिक आंदोलनांनी भारलेला होता. बौद्ध धर्म आपल्या मूळ प्रेरणांच्या दृष्टीने पूर्णपणे लोप पावला होता. या वातावरणात शेव आणि शाक्त यांच्या तंत्रसाधनेला बहर आला होता. तंत्रसाधनेत जैव धर्म हो अडकला. वैष्णवाच्या मांदियाळीत तंत्रसाधनेला पूर्णपणे मज्जाव नसला तरी गीता भागवताच्या निर्मात्यांनी पोसलेला ज्ञाननिष्ठ व सत्त्वसंपन्न भक्तिचा प्रवाह क्षीण स्वरुपात का होईना त्यांनी वाहता ठेवला.आद्य मराठी वाङ्मयाचे निर्माते वा प्रेरक कोण? असा स्थूल विचार जरी केला तरी आपणास चक्रधर, मुकुंदराज, ज्ञानेश्वर— नामदेव वा चौघांनी त्या काळातीलच नव्हे तर पुढील पाच शतकातील वाङ्मय प्रेरित केले असा निष्कर्ष काढता येतो.

हे सत्पुरुष कोणत्या ना कोणत्या तरी संप्रदायाचे धुरीण आहेत. त्या संप्रदायाचा उगम, विकास व ह्रास यासंबंधी नेमकेपणाने उत्तरे देता आली तरच आपणास एकूण सांस्कृतिक इतिहासाचे समग्र भान घडू शकेल. त्यांचे संपूर्ण तत्त्वज्ञान, आचार—विचार, वैचारिक अधिष्ठान निर्माण करणारे व टिकवणारे पुरुष या सर्वांचे सर्वांगीण आकलन कसे घडेल हा खरा प्रश्न आहे? तेराव्या शतकाच्या शेवटी ज्ञानेश्वरानी भगवतगीतेवर

विद्यावर्धिनी संचालित,
अण्णासाहेब वर्तक मानव्य महाविद्यालय,
केदारनाथ मल्होत्रा वाणिज्य महाविद्यालय व
ई. एस. अंड्राडिस विज्ञान महाविद्यालय
(मुंबई विद्यापीठाशी संलग्न) आणि
कनिष्ठ महाविद्यालये, वसई रोड (प.) जि. पालघर – ४०१२०२

VIDYA VARDHINI
॥ सा विद्या या विमुक्तये ॥

## मराठी विभाग

आणि

Indian Council of Social Science Research

भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद (ICSSR), पश्चिम विभागीय केंद्र, मुंबई
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# ॥ संत साहित्याची समकालीनता ॥

## एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

शनिवार दि. १७ डिसेंबर २०२२

# प्रमाणपत्र

श्री / श्रीमती Sudhir B. Saindane

महाविद्यालय Annasaheb vartak college, vasai road (W) palghar

यांनी एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात [redacted] / ~~साधनव्यक्ती~~ / शोधनिबंध वाचक / [redacted] म्हणून सहभाग घेतला आणि

संत नामदेवांची आध्यात्मिक लोकशाही

या विषयावर शोधनिबंध वाचन केले, त्याबद्दल हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| डॉ. शत्रुघ्न फड | डॉ. सखाराम डाखोरे | प्रा. शैलेश औटी | डॉ. अरविंद उबाळे |
| समन्वयक | सहसमन्वयक | सहसमन्वयक | निमंत्रक |
| (मराठी विभाग प्रमुख) | (सहाय्यक प्राध्यापक) | (सहाय्यक प्राध्यापक) | (प्राचार्य) |